नोंदणी व मुद्रांक विभाग
महाराष्ट्र शासन
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
नोंदणी व मुद्रांक विभाग
तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे -411001
दुरध्वनि क्र. ०२० - २६१२३८२६ ई-मेल :- do5.igro@maharashtra.gov.in

जा.क्र का.५/मुद्रांक/प्र.क्र.०६/२०१६/५८२/२०२५ दिनांक- १९/०९/२०२५

# आदेश

वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.DO No.-06/2/2019-BO.II दि.११/०८/२०२० नुसार नागरीकांना सुविधा होण्याच्या दृष्टीने ई-साईनींग व ई-स्टॅम्पींगची प्रणाली नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमीटेड (NeSL) या कंपनीव्दारे विकसीत करण्याचे निर्देश मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र सरकार यांना दिलेले आहेत. भारतीय रिजर्व बँकेच्या क्र. RBI/2017-18/110, DBR.No.Leg. Bbc.98/09.08.019/2017-18 दि. १९/१२/२०२० या पत्रानुसार नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमीटेड (NeSL) ही 'भारतीय दिवाळखोरी व शोधन अक्षमता मंडळ (माहीती उपयोगितता (IUs)] नियमन २०१७ (Insovency and Bankruptcy Board of India) दि.२५/०९/२०१७ अन्वये केंद्र सरकारद्वारे मान्यताप्राप्त माहीती उपयोगितता (Information Utility) आहे.

त्या अनुषंगाने नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्विसेस लिमीटेड (NeSL) या संस्थेने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुच्छेद १०(ड) द्वारे मुद्रांक शुल्क भरणा करण्यासाठी सहभागी बँकांसोबत प्रणाली तयार केलेली आहे. महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध अधिसुचना क्र. असाधारण चार-ब क्रमांक ४५१ दि.०४/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसुची एक मधील अनुच्छेद क्र.२८ (सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादन शुल्क बंधपत्र) अन्वये आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्क भरण्याची मान्यता दिलेली आहे.

सबब, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम १०(ड) अंतर्गत मुद्रांक शुल्क आकारणीची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने, निष्पादित सामंजस्य करारानुसार नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्व्हीस लि. (NeSL) या कंपनीस, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसुची एक मधील अनुच्छेद क्र.२८ (सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादन शुल्क बंधपत्र) अन्वये अनोंदणीकृत दस्तऐवजांवर मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यासाठीची प्रणाली कार्यान्वित करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Rawl:
रविंद्र बिनवडे (भा.प्र.से)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.
19/9/2025

प्रति,

Managing Director and CEO
National e-Governance Services limited,
Gresham Assurance House, 4th Floor,
Sir P.M. Road, Fort, Mumbai – 400001

प्रत सादर -

१. कार्यासन अधिकारी (म-1) महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२
२. अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
३. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे
४. सर्व नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
५. सीमाशुल्क विभाग, मुंबई